ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 8434. Licence No. 53.

वर्ष २४ पुणें, बुधवार तारीख २२ जानेवारी, १९५८ अंक ४

## विविध माहिती

**शरावती नदीवरील धरण**—म्हैसूर राज्याच्या विकासांत शरावती नदीवरील धरणाच्या व वीजनिर्मितीच्या योजनेला फार महत्त्वाचें स्थान असल्यामुळें मध्यवर्ती सरकारनें ह्या योजनेचा दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत समावेश केला नाहीं. तरी म्हैसूर राज्यसरकार योजनेचें काम चालू करील, अशी माहिती राज्याचे मुख्य मंत्री श्री. निजलिंगप्पा ह्यांनीं सांगितली आहे.

**पत्रकाराला पेन्शन**— वाराणसी येथील एक पत्रकार श्री. सूर्यनारायणराव ह्यांना उत्तर प्रदेश सरकारनें दरमहा ५० रुपयांचें पेन्शन चालू केलें आहे. १९४२ च्या राष्ट्रीय चळवळींत वयाच्या अवघ्या १६ व्या वर्षी त्यांनीं विद्यार्थ्यांचें एक निदर्शन काढण्यांत पुढाकार घेतला होता. निदर्शकांवर झालेल्या गोळीबारांत त्यांच्या पायांत तीन गोळ्या घुसल्या होत्या.

**नोटेवर जिनांची प्रतिमा नको**— पाकिस्तानच्या स्टेट बँकेनें काढलेल्या १०० रुपयांच्या नव्या नोटींवर मरहूम जिना ह्यांची प्रतिमा छापलेली आहे. कट्टर मुसलमान सर्व प्रकारची मूर्तिपूजा त्याज्य मानतात. त्यांच्या मतानें, नोटेवरील प्रतिमाहि मूर्ति ह्या सदरांतच पडते. म्हणून पाकिस्तानांतील मुल्ला, मौलवी इत्यादिकांनीं सरकारचा निषेध चालविला आहे.

**मुंबई शहरांतील आत्महत्या**— १९५७ सालीं मुंबई शहरांत दर महिना सरासरी १९ माणसांनीं आत्महत्या केली. कोणी कपडे पेटवून घेऊन, कोणी गळफास लावून, तर कोणी धावत्या आगगाडीखालीं उडी टाकून आत्मघात करून घेतला. एकूण २३९ लोकांनीं आत्महत्या केली. त्यांपैकीं ९५ स्त्रिया होत्या. सप्टेंबर महिन्यांत १५ पुरुषांनीं व १३ स्त्रियांनीं आत्महत्या केली.

**सीलोनमध्यें शब्दकोड्यांवर कर**—सीलोनच्या सरकारनें शब्दकोडीं व इतर बक्षिसांच्या स्पर्धा ह्यांच्यावर भारताप्रमाणें कर बसविण्याचा विचार चालविला आहे. ज्या स्पर्धा केवळ नफा मिळविण्याच्या हेतूनें चालविण्यांत येतील, अशा सर्व स्पर्धांच्या प्रवेशमूल्यांवर कांहीं टक्के कर बसविण्याचा कायदा करण्यांत येणार आहे. ह्या मार्गानें सरकारच्या तिजोरींत बराच पैसा जमा होईल, असा अंदाज आहे.

**अन्नाची बचत करण्यासाठीं**—पाकिस्तान सरकारनें अन्नाची बचत करण्यासाठीं असा हुकूम काढला आहे कीं, २५ माणसांपेक्षा अधिक माणसांच्या जेवणावळी घालावयाच्या नाहींत. लग्नसमारंभाच्या बाबतींत माणसांची संख्या ५० पर्यंत वाढविण्यांत आली आहे. सरकारी समारंभ सोडून, मंत्र्यांनीं दिलेल्या खान्यांनाहि हुकूम लागू करण्यांत आला आहे.

**आंध्र राज्यांत गुदामें**—शेतकऱ्यांचा माल सांठवून ठेवण्याची सोय करण्यासाठीं आंध्र राज्यांत दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत ३० गुदामें बांधण्यांत येणार आहेत. त्यांपैकीं ११ मध्यवर्ती सरकार बांधणार असून १९ राज्य सरकार बांधणार आहे. राज्यसरकार आपल्या स्वतंत्र वेअरहौसिंग कॉर्पोरेशनची स्थापना लवकरच करणार आहे.

**जपानकडून कर्ज घेणार**—भारत व जपान ह्यांच्या दरम्यान कर्जासंबंधीं वाटाघाटी टोकिओ येथें लवकरच सुरू होणार आहेत. कर्जाचा नक्की आंकडा अद्याप ठरलेला नाहीं. पण सुमारें १८०० कोटी येन म्हणजे सुमारें ५ कोटी डॉलर्स कर्ज देण्याच्या एका योजनेवर भारताचे प्रतिनिधी जपानशीं चर्चा करण्याचा संभव आहे.

**चित्रपटांपासून परदेशीय चलन**—भारतानें परदेशांना निर्यात केलेल्या चित्रपटांपासून १९५७ च्या पहिल्या आठ महिन्यांत ७२·४५ लाख रुपये किंमतीची परदेशीय हुंडणावळ मिळाली. एकूण १·५४ कोटी फूट लांबीची फिल्म निर्यात करण्यांत आली. जानेवारी ते ऑगस्ट १९५७ पर्यंत भारतानें २७·८५ लाख रुपये किंमतीच्या फिल्म्स आयात केल्या.

**सैबेरिआंत प्रचंड संशोधन-केंद्र**—रशिआनें सैबेरिआंत जगांतील सर्वांत मोठें शास्त्रीय संशोधन केंद्र स्थापन करण्याचें ठरविलें आहे. ह्या केंद्रांत १० लाख लोकांची वस्ती करण्यांत येईल. पहिल्या प्रथम गणितशास्त्र आणि निसर्गशास्त्रें ह्या विषयांत संशोधन करण्यासाठीं १३ मोठीं उपकेंद्रें स्थापन करण्यांत येतील. १९५८ सालीं ह्या शहरावर ७ कोटी रुबल्स खर्च करण्यांत येणार आहेत.

**शिपायाचा सक्रीय सन्मान**—सुरतपासून जवळ असलेल्या एका खेड्यांतील शाळेंत सीताराम गिरधार नांवाच्या शिपायानें ४० वर्षें नोकरी केली. तो सेवानिवृत्त झाला त्यावेळीं शाळेतर्फे त्याचा सत्कार करण्यांत आला. ह्या प्रसंगीं विद्यार्थ्यांनीं जमविलेल्या २,४०० रुपयांची थैली त्यास अर्पण करण्यांत आली. सत्कारांत शिक्षकांनींहि भाग घेतला होता.

**बिहारमध्यें दारूबंदी होणार**—बिहार राज्यांत दारूबंदी अंमलांत आणण्याचा निर्णय राज्यसरकारनें घेतला आहे. निर्णय अंमलांत आणण्याची तारीख अद्याप ठरलेली नाहीं. दारूबंदीचा कार्यक्रम टप्याटप्यानें चालू करण्यांत येणार आहे. राज्य सरकारच्या तिजोरींत दारूवरील अबकारी करामुळें दरसाल चार कोटी रुपये जमा होत असत. दारूबंदी पूर्णपणें अंमलांत आल्यावर ह्या उत्पन्नाला सरकारला मुकावें लागेल.

**पेन्शनसाठी वृद्धांचे अर्ज**—उत्तर प्रदेश सरकारनें ७० वर्षे वयाच्या ज्या वृद्धांना उपजीविकेचें साधन नसेल त्यांना पेन्शन देण्यासाठी गेल्या वर्षी २५ लाख रुपयांची तरतूद केली होती. राज्यांतून सुमारें ७,००० वृद्धांनीं योजनेप्रमाणें मिळावयाच्या पेन्शनसाठी अर्ज केले होते. त्यांपैकी २,००० वृद्धांना आतांपर्यंत पेन्शन मंजूर करण्यांत आलें आहे.

**पोलाद कारखान्यांचा खर्च**—रूरकेला, भिलई आणि दुर्गापूर येथें काढण्यांत येणाऱ्या पोलादाच्या कारखान्यांच्या भांडवली खर्चांत वाढ करण्यांत आली आहे. ह्या कारखान्यांच्या अनुषंगानें ज्या इतर वस्तू निर्माण करण्यांत येणार आहेत त्यांची व्यवस्था करण्यामुळें ही वाढ झालेली आहे. भिलई येथील कारखान्याला आतां १३० कोटी रुपये खर्च येईल.

**४०० वर्षांपूर्वीचीं फर्मानें**—हैदराबाद शहराची स्थापना १५९१ सालीं कुतुबशहा ह्यानें केली. गोंवळकोंडयाच्या चारशें वर्षांपूर्वींच्या राजांनीं काढलेली फर्मानें व राजघराण्यांतील लोकांनीं केलेल्या कवितांची हस्तलिखितें राज्यसंस्थापकांच्या स्मृतिदिनानिमित्त नुकतीच लोकांना पहाण्यासाठी ठेवण्यांत आलीं होतीं. हे जुने लेख उर्दूंत व तेलगूंत आहेत.

**महारोगासंबंधीं संशोधनकेंद्र**—महारोगासंबंधीं संशोधन करणाऱ्या एका केंद्राची स्थापना मद्रास राज्यांत करण्यांत येणार आहे. ह्या केंद्रासाठी भारत सरकारनें दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत २५ लाख रुपयांची तरतूद केली आहे. संशोधन केंद्राच्या इमारतीसाठी ४ लाख रुपये खर्च येणार असून ती लवकरच पुरी होईल.

**रामकृष्ण परमहंसांचें चरित्र**—भारताचे प्रसिद्ध संतपुरुष रामकृष्णपरमहंस ह्यांचें चरित्र लिहिण्याचें काम इंग्लिश कादंबरीकार ख्रिस्टॉफर इशरवुड ह्यांनीं चालविलें आहे. सुप्रसिद्ध इंग्लिश लेखक अल्डस हक्स्ले ह्यांच्याप्रमाणेंच ते रामकृष्ण संप्रदायाचे अनुयायी आहेत. चरित्रासाठी साहित्य गोळा करण्यासाठी त्यांनीं नुकतीच रामकृष्णांच्या जन्मग्रामाला भेट दिली होती.

**भारतासाठी नवी बोट**—इंडिआ स्टीमशिप कंपनीकरतां बांधण्यांत आलेल्या नव्या बोटीचा जलवितरणसमारंभ हॅंबुर्ग येथें साजरा करण्यांत आला. हॅंबुर्गमधील जर्मन कंपनीनें कंपनीसाठी बांधलेलें हें सहावें जहाज आहे. आणखी चार बोटी बांधण्यांत येणार आहेत. नुकत्याच बांधलेल्या बोटीचें वजन ११,८०० टन आहे.

**यात्रेकरूंसाठी झोपड्या**— हिमालयांतील गंगोत्रीसारख्या पवित्र ठिकाणांच्या यात्रा करण्यासाठी दरसाल शेंकडो लोक जातात. त्यांना निवारा देण्यासाठी मार्गावर बऱ्याच ठिकाणीं लाकडाच्या झोपड्या बांधण्यांत येणार आहेत. ह्या कामासाठी भारत सरकारनें उत्तर प्रदेश सरकारला एक लाख रुपयांची मदत करण्याचें ठरविलें आहे.

**अमेरिकेचें पोलादाचें उत्पादन**—१९५७ सालीं अमेरिकेंतील पोलादाचें उत्पादन ११,३०,००,००० टन झालें. हें उत्पादन १९५६ मधील उत्पादनापेक्षा २०,००,००० टनांनीं कमी आहे. १९५८ सालीं उत्पादन ह्याहिपेक्षा कमी होण्याचा संभव आहे. कामगार संघटनेनें दिलेल्या आंकड्यांप्रमाणें १,२५,००० पोलाद कामगार बेकार असून आणखी २,००,००० कामगार अपुऱ्या रोजगारीवर आहेत.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई ३

अन्नाचें रहस्य





बेडेकर मसाले, लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.
★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—मुगभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ३० शुक्रवार पेठ, पुणें —

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.



# अर्थ

बुधवार, ता. २१ जानेवारी, १९५८


संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## पश्चिम जर्मनी व रशिया ह्यांचे संबंध सुधारणार

पश्चिम जर्मनीचें सरकार व रशिआ ह्यांच्या संबंधांत सुधारणा होणार असल्याच्या वार्ता येत आहेत. गेल्या वर्षीच्या सप्टेंबर महिन्यापर्यंत उभयता देशामधील विवाद्य प्रश्न वाटाघाटीनें सोडविण्याचे सर्व प्रयत्न फसले होते. पण आतां रशिआच्या वाढत्या लष्करी सामर्थ्यामुळें पश्चिम जर्मनीच्या सरकारच्या वृत्तींत फरक पडल्याचीं चिन्हें दिसत आहेत. रशिआनें ५,००० मैल पल्ल्याचे अग्निबाण बनविण्यांत यश मिळविल्यापासून जर्मनीमधील लोकांच्या विचारांत बदल झालेला आहे आणि तोच जर्मन सरकारच्या वृत्तींत प्रतिबिंबित झालेला आहे. रशिआ आणि जर्मनी ह्यांच्यामध्यें युद्धोत्तर कालांत राजकीय संबंध प्रस्थापित झाल्यावर व्यापारी करार करण्याचे प्रयत्न करण्यांत आले. पण ते यशस्वी झाले नाहींत. पण आतां मात्र रशिआ व जर्मनी ह्यांनीं परस्परांत ३ वर्षें मुदतीचा व्यापारी करार करण्याचें ठरविलें आहे. कराराप्रमाणें ह्या कालांत उभयपक्षीं सुमारें ३०० कोटी मार्क किंमतीच्या मालाची देवाण-घेवाण होणार आहे. औद्योगिक क्षेत्रांत रशिआनें आश्चर्यकारक प्रगति केलेली असली तरी आंतल्या अवाढव्य भूविस्ताराचा आर्थिक विकास करण्यासाठीं त्याला जर्मनीसारख्या परदेशांच्या मदतीची अजूनहि जरूरी आहे. जर्मनीचीच काय, पण सायबेरिआंतील औद्योगिक विकास साधण्यासाठीं रशिआ जपानचीहि मदत घेण्यास तयार आहे. वास्तविक, आर्थिक दवाण-घेवाणींतून राष्ट्रांमधील संबंध सुधारण्यास प्रारंभ होत असतो. पण सध्याच्या गतिमान् युगांत लष्करी अगर राजकीय घटनांचाहि आर्थिक संबंधावर परिणाम होत असतो. राष्ट्राराष्ट्रांच्या संबंधांतील दुवे उलट-सुलट करण्याची इतिहासांत सुप्त शक्ति असते असें दिसतें.

---

## केरळचं औद्योगीकरण करण्यास आवाहन

केरळचे कम्युनिस्ट मुख्यमंत्री, श्री. नंबुद्रीपाद ह्यांनीं, अखिल भारतीय कारखानदार संघाच्या प्रतिनिधींशीं राज्याच्या औद्योगीकरणाविषयीं मुंबई येथें चर्चा केली. संघानें आपलें एक प्रतिनिधी मंडळ राज्याच्या दौऱ्यावर पाठवून औद्योगीकरणाच्या शक्यतेविषयीं अंदाज घ्यावा, अशी सूचनाहि त्यांनीं केली. ह्या विषयासंबंधीं आपले विचार व्यक्त करतांना श्री. नंबुद्रीपाद म्हणाले कीं, केरळचें सरकार राज्यांतील कारखानदार व कामगार ह्यांच्यांत मूलभूत स्वरूपाच्या मुद्यावर दीर्घकालीन औद्योगिक शांततेचा करार घडवून आणण्याच्या प्रयत्नांत आहे. कारखानदारांनीं केरळमध्यें भांडवल तर गुंतवावेंच, पण तेथील लोकांनी आपली बचत उद्योगधंद्यांत गुंतवावी म्हणून त्यांचें मनहि वळविण्याचा प्रयत्न करावा. सध्या केरळमधील लोकांची वृत्ति ज़मिनींत पैसा गुंतविण्याची अधिक दिसून येते. केरळमधील खाजगी भांडवलाला मदत करण्यासाठीं नियोजन समितीनें भरपूर तरतूद करावी अशी मागणी राज्य सरकारनें केली आहे. ती अजून मान्य झालेली नाहीं. ही मदत जरी मिळाली नाहीं तरी राज्यसरकार स्वतःच्या जबाबदारीवर मदतीची योजना पार पाडण्याचा प्रयत्न करील. परदेशीय भांडवलाचीहि गरज आहे आणि तें मिळविण्यासाठीं सर्व तऱ्हेचे प्रयत्न झाले पाहिजेत. पण परदेशी भांडवल ज्या अटीवर मिळविण्यांत येईल त्या अटी वाजवी आणि देशाच्या हितसंबंधांना पोषक अशा असल्या पाहिजेत. अशा प्रकारच्या अटींवर परदेशीय भांडवल मिळणार नसेल तर त्याशिवाय विकासाचे कार्यक्रम पार पाडण्याची तयारी ठेवली पाहिजे. अर्थात् परदेशी भांडवलाला भारतांत त्याच्या मायदेशापेक्षा थोडा अधिक नफा मिळाला पाहिजे.

---

## अमेरिकन अर्थशास्त्रज्ञाचे योजनेविषयीं विचार

भारताच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या संभाव्य यशापयशासंबंधीं अलीकडे बरीच चर्चा चाललेली असते. योजना यशस्वी करून दाखविण्यासाठीं कोणत्या परिस्थितीची गरज आहे ह्यासंबंधीं प्रसिद्ध अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ डॉ. हॅनसेन ह्यांनीं पुढीलप्रमाणें विचार व्यक्त केले आहेत. "जागतिक अर्थव्यवस्थेंतील प्रवाह' ह्या विषयावर ते बोलत होते. डॉ. हॅनसेन म्हणाले कीं, भारतानें आपली औद्योगिक प्रगति साधण्यासाठी दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाची कांस धरली आहे. त्याचबरोबर समाजवादी पद्धतीची समाजव्यवस्था ध्येय म्हणून स्वीकारण्यांत आलेली आहे. हें ध्येय आणि तें गांठण्यासाठीं जीं साधनें वापरण्यांत येणार आहेत त्यांमध्यें विसंवाद उत्पन्न होऊन द्यावयाचा नसेल तर कार्यक्रमाच्या प्राथमिक अवस्थांत तरी बऱ्याच प्रमाणांत परदेशीय आर्थिक साह्याची जरूरी आहे. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत भारी उद्योगधंद्याच्या जलद विकासावर भर देण्यांत आलेला आहे. हा खात्रीचा मार्ग आहे, ह्यांत शंका नाहीं. पण, ह्या मार्गानें गेल्यास शहरांची वाढ अधिक होईल आणि ग्रामीण व शहरी जीवनांतील आर्थिक विषमता आणखी रुंदावेल. उलटपक्षीं, आहे ती साधनसंपत्ति विकासाच्या सर्व क्षेत्रांसाठी सारख्या प्रमाणांत वापरण्यांत आली तर प्रत्यक्ष फलप्राप्तीच्या दृष्टीनें फारसें कांहीं पदरांत पडणार नाहीं. म्हणूनच परदेशीय मदतीची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता आहे. ज्या देशांत दरडोई अन्नधान्याच्या उत्पादनाचें प्रमाण चांगलें आहे आणि नैसर्गिक साधनसंपत्ति विपुल आहे, त्या देशांत लोकसंख्येच्या वाढीचा प्रश्न धोका निर्माण करणारा ठरण्याचें कारण नाहीं.

---

**कारवार बंदराचा विकास**—भारतामधील बंदरांची पहाणी करणारा जपानी तज्ज्ञांचा एक संघ सध्या दौऱ्यावर आहे. जपानी तज्ज्ञांनीं कारवार बंदराची पहाणी केल्यावर, तें एक नैसर्गिक व उत्कृष्ट बंदर असल्याचा अभिप्राय व्यक्त केला आहे. मात्र, ह्या बंदराच्या विकासासाठीं ते रेल्वेनें देशाच्या आंतील भागाशीं जोडण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादन केली आहे.

## भारताच्या गरजा व अणुशक्तीचा विकास

भारताच्या अणुशक्ति मंडळाचे अध्यक्ष डॉ. भाभा ह्यांनीं अणुशक्तीच्या विकासासाठीं भारतांत कसा वाव आहे ह्यासंबंधीं आपले विचार व्यक्त केले आहेत. बंगलोर येथें ह्या विषयावर बोलतांना ते म्हणाले कीं, आज भारतांत कोळशाचा जो सांठा ज्ञात आहे त्यापासून जेवढी औद्योगिक शक्ति निर्माण होईल त्याच्या ३० पट शक्ति उत्पादन होऊं शकेल इतका युरेनिअमचा व थोरिअमचा सांठा भारताजवळ आहे. दर माणशीं खर्च होणाऱ्या औद्योगिक शक्तीच्या दृष्टीनें विचार करतां, आज पुढारलेल्या देशांत हा खप जितका होतो तितका ३०० वर्षेपर्यंत होत रहाण्याची शक्यता आहे. औद्योगीकरणासाठीं पहिली कोणती गरज असेल तर विजेच्या शक्तीची आहे. भारतामधील विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेतां अणुशक्तीच्या साह्यानें वीज निर्माण करणें सोईचें ठरणार आहे. भारताला अणुशक्तीच्या साह्यानें होणारें विजेचें उत्पादन विशेष सोईचें असण्याचीं दोन कारणें आहेत. पहिलें असें कीं, भारतांत कोळशाच्या खाणी कांहीं भागांतच आहेत. रेल्वेनें कोळशाची वहातूक करावयाची म्हटलें तरी रेल्वेच्या वाहतुकीच्या सामर्थ्यालाहि कांहीं मर्यादा आहेत. दुसरें कारण म्हणजे औद्योगिक दृष्ट्या पुढारलेल्या कांहीं भागांत औद्योगिक शक्तीचा फारच तुटवडा आहे. आणि भारतांत असा भाग बराच आहे. ह्या भागांना औद्योगिक शक्तीचा पुरवठा करण्यासाठीं अणुशक्तीचें साह्य घेणें जरूर आहे. ह्या बाबतचें तांत्रिक ज्ञान व यंत्रसामुग्री बाहेरून आणतां येण्यासारखी आहे; इतकेंच काय, पण जरूर तें तांत्रिक ज्ञान खुद्द भारतांतच पांचसात वर्षांच्या अवधींत उपलब्ध होऊं शकेल. खरा प्रश्न आहे तो औद्योगीकरण झपाट्यानें करण्यासाठीं लागणारें भांडवल बचतींतून कसें गोळा करावें, असा आहे.

### भारताची आंतरराष्ट्रीय येण्या-देण्याची परिस्थिति

( सरकारी व खासगी विभाग मिळून; आंकडे कोटी रुपयांचे )

| | एकूण देणें | एकूण येणें | निव्वळ येणें-देणें |
|---|---|---|---|
| **सरकारी विभाग** | | | |
| ३०-६-१९४८ | १७८.१ | १९३९.६ | + १७६१.५ |
| ३१-१२-१९५३ | २४९.६ | १२०६.६ | + ९५०.७ |
| ३१-१२-१९५५ | २०९.९ | ११७०.७ | + ९६०.८ |
| **खासगी विभाग** | | | |
| ३०-६-१९४८ | ३२६.१ | ६९.१ | - २५७.० |
| ३१-१२-१९५३ | ४७६.८ | ७७.४ | - ३९९.४ |
| ३१-१२-१९५५ | ५५६.४ | ८१.१ | - ४७५.३ |

## सन १९५८-५९ मधील सहकारी विकासाचा कार्यक्रम

राष्ट्रीय सहकारी विकास आणि गुदाम मंडळाच्या कार्यकारी समितीनें १९५८-५९ मधील सहकारी विकास कार्यक्रमास मान्यता दिली. या कार्यक्रमांत २,६०० मोठ्या सोसायट्यांच्या स्थापनेचा अंतर्भाव आहे. याच मुदतींत सुमारें १० हजार छोट्या सोसायट्यांची स्थापना होईल किंवा जुन्या सोसायट्या व्यवस्थित करण्यांत येतील असा अंदाज आहे. याशिवाय शेतमाल सांठविण्यासाठीं ९०० मोठ्या सोसायट्यांनीं गुदामें बांधावींत असें संकल्पिण्यांत आलें आहे. मार्केटिंग सोसायट्याहि ३९० गुदामें बांधणार आहेत. याशिवाय १९५८-५९ मध्यें ५०० मार्केटिंग व २९ प्रक्रिया करणाऱ्या सोसायट्यांची वाढ करण्यांत येईल. सदर कार्यक्रमामुळें व्यवस्थापक, पर्यवेक्षक व हिशेबतपासनीस म्हणून सुमारें ३,६०० व्यक्तींना रोजगार मिळेल असा अंदाज आहे. तसेंच कांहीं विशिष्ट कामासाठीं त्यांना आर्थिक मदतहि मिळते. चालू आर्थिक वर्षांत मध्यवर्ती सरकारनें आणखी ३० औद्योगिक वसाहती उभारण्याची मंजुरी दिलेली असून, त्याकरतां सुमारें १ कोटी रुपये मंजूर केलेले आहेत. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत औद्योगिक वसाहतीसाठीं केलेली तरतूद १० कोटी रुपयांवरून वाढवून ती १५ कोटी रुपये केलेली आहे.

---

## राष्ट्रीय सहकारी विकास व गुदाम मंडळाची प्रगति

राष्ट्रीय सहकारी विकास आणि गुदाम मंडळानें १९५६-५७ मध्यें १२४९ मोठ्या व ६०२ छोट्या आणि २२ प्रक्रिया करणाऱ्या सहकारी संस्थांना आर्थिक मदत दिली. याशिवाय २२४ प्राथमिक, २० जिल्हा व ७ शिखर ( अपेक्स ) सहकारी विक्री संस्थांनाहि मंडळाकडून मदत मिळाली. त्याचप्रमाणें या मंडळाकडून साह्य घेतलेल्या पतपेढ्यांत १३१ मध्यवर्ती बँका, ७ शिखर सहकारी बँका व ५० लँडमार्गेज बँका यांचा अंतर्भाव होतो. सदर वर्षांत ५९४ गुदामें बांधण्यासाठीं या मंडळानें पतपेढ्यांना व विक्रीसंस्थांनाहि साह्य दिलें. या मंडळानें १९५६-५७ मध्यें शेतकी सहकारी संस्थांना १९७ लक्ष रु. ची मदत दिली. त्यापैकीं १७५ लक्ष रु. कर्जाऊ व २२ लक्ष रुपये साह्य म्हणून देण्यांत आले.

यासेरीज, मध्यवर्ती गुदाम-कॉर्पोरेशनच्या भाग भांडवलांत ४० लक्ष रुपये गुंतविण्यांत आले. सन १९५७-५८ मध्यें २९२५ मोठ्या, ४७९ विक्रीव्यवहार करणाऱ्या, २६ प्रक्रिया करणाऱ्या सहकारी संस्था, एकतर स्थापन केल्या जात आहेत वा असलेल्या जोमदार बनविण्यांत येत आहेत. चालू वर्षांत १४५१ गुदामें बांधण्यांत येतील. मध्यवर्ती गुदाम कॉर्पोरेशनच्या जोडीस मार्च, १९५८ पर्यंत ११ राज्य गुदामकॉर्पोरेशनें स्थापन होतील.

**विशाखापट्टम् येथील कारखाना**—विशाखापट्टम् येथील बोटी बांधण्याच्या कारखान्याचा विस्तार करण्यास मदत करण्यासाठीं भारत सरकारनें ब्रिटिश सरकारकडे कांहीं तज्ज्ञांची मागणी केली आहे. तांत्रिक सल्ल्याबाबत सध्यां एका फ्रेंच कंपनीशीं असलेला करार त्याची मुदत संपल्यावर, म्हणजे ता. १५ जून १९५८ पासून रद्द करण्यांत येणार आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## हिंदी साखरेच्या धंद्याची उत्कृष्ट प्रगति

गेल्या तीन-चार वर्षांत भारतांतील साखरेचें उत्पादन खूपच वाढलें आहे, त्याचप्रमाणें खपहि सुधारला आहे. दरवर्षी ११ ते १२ लक्ष टनांपेक्षा खप जास्त होणार नाहीं, असें कांहीं वर्षांपूर्वी वाटत होतें. परंतु, १९५१–५२ नंतरचे वार्षिक आकडे दर्शवितात कीं, खप कल्पनेपेक्षा अधिक होत आहे. साखरेवरील अबकारी कर हंड्रेडवेटास ५·६२ रु. होता तो १६ मे, १९५७ पासून ११·२५ रु. करण्यांत आला, त्याचा मात्र खपावर थोडा परिणाम होईल.

१९५६–५७ मधील उत्पादन २०·२५ लक्ष टनांचें आहे; २२·५ लक्ष टनांचें लक्ष १९६०–६१ पूर्वींच गांठलें जाईल असें दिसत आहे. कारण, चालू कारखान्यांचें उत्पादन सुधारत आहे, दररोजची ऊसगाळणी वाढत आहे, ऊसगाळणीचा मोसम मोठा होत आहे आणि नवे नवे कारखाने उत्पादनास प्रारंभ करीत आहेत. साखरेचा खपहि वाढत जाईल. १९६०–६१ चे सुमारास उत्पादन २५ लक्ष टनांवर जाऊन, दरसाल २ ते ३ टन साखर निर्गतीस उपलब्ध राहील, असा आजचा अंदाज आहे.

साखरेच्या उत्पादनास उसाचा तुटवडा नाहीं. उसाच्या एकूण पिकांपैकी ३२% उसाची साखर केली जात असून बाकीच्याचा उपयोग इतर उत्पादनाकडे होत आहे. त्याचा तपशील सोबतच्या तक्त्यांत दिला आहे.

### उसाचा उपयोग कसा केला जातो?

% चे आंकडे

| मोसम | उसाचें पीक | गूळ | खांडसरी | पांढरी साखर | खतें, बेणें इ. |
|---|---|---|---|---|---|
| १९५१–५२ | ६०·६८० | ५३·३९ | २·७४ | २५·५४ | १८·३२ |
| १९५२–५३ | ५०·१९० | ५३·५२ | ३·३९ | २५·३६ | १७·७३ |
| १९५३–५४ | ४३·८७३ | ५५·८२ | ३·२४ | २२·१९ | १८·७५ |
| १९५४–५५ | ५६·९२३ | ५०·६३ | ३·०० | २८·०० | १८·३७ |
| १९५५–५६ | ५७·९४९ | ४७·६२ | २·६५ | ३२·६८ | १७·०५ |

### साखरेचा खप आणि दर माणशीं उठाव

| वर्ष | टन | साखर (पौंड) | गूळ (पौंड) | एकूण (पौंड) |
|---|---|---|---|---|
| १९४७–४८ | १,०४५ | २·३ | २२·२ | २९·५ |
| १९४८–४९ | १,१८२ | ९·० | १७·५ | २६·५ |
| १९४९–५० | १,१८५ | ७·० | १७·२ | २४·२ |
| १९५०–५१ | १,१९५ | ७·६ | २१·५ | २९·१ |
| १९५१–५२ | १,२२७ | ७·७ | २०·३ | २८·० |
| १९५२–५३ | १,६३४ | १०·० | १६·४ | २६·४ |
| १९५३–५४ | १,८९४ | ११·० | १५·० | २६·० |
| १९५४–५५ | १,८५० | ११·० | १७·० | २८·० |
| १९५५–५६ | २,०३२ | १२·० | १६·० | २८·० |

उसाखालील क्षेत्रांत वाढ होत आहे, पण दर एकरीं उसाचें प्रमाण अजून फार कमी आहे व तें वाढण्यास पुष्कळच वाव आहे. दक्षिण भारतांत उसाची लागवड वाढत आहे व तेथें दर एकरीं उत्पादन उत्तर प्रदेश व बिहारपेक्षा अधिक आहे. मुंबई व म्हैसूर राज्यांत उसाचें दर एकरीं उत्पन्न ५० टन होतें, तर उत्तर प्रदेश व बिहार येथील सरासरी फक्त १३ ते १४ टन आहे. उसाचे दर एकरीं उत्पादनाचे राज्यवार तुलनात्मक आकडे सोबतच्या तक्त्यांत दिले आहेत.

### साखरेचें दर एकरीं उत्पन्न

| | १९४८–४९ | १९५२–५३ | १९५५–५६ |
|---|---|---|---|
| | टन | टन | टन |
| उ. प्रदेश | १२·७ | १७·० | २०·५ |
| बिहार | १२·० | १८·४ | २०·० |
| मुंबई | ३१·० | (१) ४०·० | ३·४१ |
| | | (२) २४·७ | |
| मद्रास | २५·० | ३३·९ | ३६·५ |
| आंध्र | २५·० | ३०·३ | ३४·० |
| पंजाब | १२·९ | १८·८ | २६·० |
| बंगाल | १६·१ | १९·० | २२·० |
| म्हैसूर | १८·८ | ... | ... |

१ महाराष्ट्रांतील कालव्यांचें क्षेत्र.

२ कर्नाटक.

हवईमधील दर एकरीं उत्पादन ६२ टन, पेरूमध्यें ४१ टन, इंडोनेशियांत ४५ टन, तर भारतांत १४ टन!

१९५७ हें वर्ष हिंदी साखरेच्या निर्गतीस अनुकूल होतें; कारण जगाच्या बाजारपेठांतून साखरेची किंमत चढीची होती. ह्याचें कारण, सुरवातीचा साखरेचा सांठा मर्यादित होता आणि सुएझ प्रकरणामुळें आयात करणाऱ्या देशांनीं साखर त्वरेनें मिळविण्याची धडपड चालविली. १९५८ मध्यें १९५७ प्रमाणेंच भारताला साखर निर्यात करतां आली, तर हुंडणावळीची तंगी कमी होण्यास मदत होईल.

हिंदी साखरेच्या धंद्यानें आतां एवढी प्रगति केली आहे, कीं भारत आतां साखरेच्या बाबतींत स्वावलंबी झाला आहे. सुमारें दोन कोटी शेतकऱ्यांचा साखरेच्या धंद्यांत हितसंबंध गुंतलेला आहे. सुमारें १०० कोटी रुपयांच्या हिंदी भांडवलास ह्या धंद्यांत किफायतशीर गुंतवणुकीस वाव मिळाला आहे. विद्यापीठांच्या किमान ३,५०० पदवीधरांना व १,२५,००० कामगारांना साखर कारखान्यांत काम मिळत आहे. साखरेच्या धंद्याची आणखी वाढ होत असून, साखरेची निर्गत परदेशी हुंडणावळ मिळवून देईल, अशीं सुचिन्हें दिसत आहेत.

गेल्या दोन वर्षांत ५४ नव्या कारखान्यांना परवाने दिले, त्यांपैकी ३९ कारखाने सहकारी स्वरूपाचे आहेत. त्यांपैकी कांहीं सुरू झाले असून बाकीचे येत्या एक-दोन हंगामांत सुरू होतील. यंत्रसामुग्री मिळण्यास विलंब लागल्यामुळें ह्या कारखान्यांची उभारणी लांबणीवर पडली. गूळ आणि खांडसारी साखर हिशेबांत घेतली, तर साखर उत्पादन करणाऱ्या देशांत भारताचा पहिला अनुक्रम लागेल.

**तेल सांपडेलच असें नाहीं**—पंजाबमधील ज्वालामुखी ह्या ठिकाणीं रशिअन तंत्रज्ञांच्या साह्यानें भूगर्भातील तेल शोधण्याचा प्रयत्न चालू आहे. आतांपर्यंत ५,६०० फूट खोल खोदाई करण्यांत आली आहे. अतिशय कठीण खडक लागल्यामुळें खोदाई सावकाश होत आहे. काम बहुधा जून अखेर संपेल. पण तेल सांपडेलच अशी खात्री देतां येत नाहीं.

## मुंबई सहकारी कायद्यावरील लाड समितीचा अहवाल

### ( लेखांक २ )

लेखकः—श्री. स. वा. कुलकर्णी, बी. ए., एलूएल्. बी. पुणें ४.

### विविध कार्यकारी सहकारी संस्था

रूरल क्रेडिट सर्व्हे-समितीच्या अहवालाप्रमाणें मुंबई राज्यांत मोठ्या विविध कार्यकारी सहकारी संस्था स्थापणेचे योजनेस उत्तेजन देणेचें धोरण आहे; आणि म्हणून लहान लहान विविध कार्यकारी संस्थांचें एकत्रीकरण होणेचे दृष्टीनें १९५६ च्या दुरुस्तीप्रमाणें योग्य ती तरतूद केलेली आहे. परंतु सदरच्या कायद्यांतील कलम १५ अ (३) प्रमाणें कांहीं विशिष्ट अडचणी निर्माण होतात. ह्या अडचणी टाळून सहकारी संस्थांचें सामीलीकरण करणेसाठी योग्य ते अधिकार रजिस्ट्रार यांना सुपूर्त करणेची तरतूद सुचविलेली दिसते.

### सहकारी संस्थांचें पुनरुज्जीवन

सांपत्तिक दृष्ट्या डबघाईस आलेल्या सहकारी संस्थांचें पुनरुज्जीवन करून त्यांचा कारभार पूर्ववत् सुरळीत चालू करणेचे दृष्टीनें योग्य ती योजना कलम १९ मध्यें मांडलेली आहे. सांपत्तिक हलाखींत दिवस कंठणारी सहकारी संस्था फार काळ तग धरूं शकत नाहीं. अशा संस्थेचें पुनरुज्जीवन करतांना सर्व सभासद व धनको यांची अनुमति मिळाल्याशिवाय त्यांतून मार्ग काढतां येत नाहीं. कांहीं वेळेस एकादा धनको अगर कांहीं सभासद अडेलपणानें, स्वार्थानें, संस्थेच्या पुनरुज्जीवनास आडकाठी करूं लागल्यास त्या संस्थेचा कारभार सुधारणेसाठी विशिष्ट प्रकारची योजना अंमलांत आणणेस अडचण निर्माण होते. ही अडचण टाळून सहकारी संस्थेचा कारभार सुधारणेसाठी योग्य तो अधिकार दिला पाहिजे. अशा स्वरूपाच्या तरतुदी सदरच्या कलमांत सुचवल्या आहेत. सहकारी संस्थेच्या ३/४ सभासदांनीं अगर एकूण कर्ज रकमेपैकी ३/४ कर्ज किंमतीच्या धनकोनीं एकादी तडजोड अगर योजना सुचविल्यास व रजिस्ट्रार यांनीं मान्यता दिल्यास अशा तऱ्हेची तडजोड अगर व्यवस्था सर्व सभासदांवर अगर धनकोंवर व सदरच्या सहकारी संस्थेवर बंधनकारक राहील. सुचविलेली तडजोड अगर योजना समाधानकारकपणें अंमलांत आणतां येत नाहीं असें रजिस्ट्रार यांना वाटल्यास ती योजना अगर तडजोड रद्द करणेसाठी योग्य तो हुकूम करतां येईल.

### सहकारी संस्थांच्या सभासदांचे हक्क व जबाबदाऱ्या

#### सभासद

सहकारी संस्थांचे सभासद कोणास होतां येईल याबाबत तपशीलवार माहिती दिलेली असून व्यक्ति, फर्म, कंपनी, सोसायटीज रजिस्ट्रेशन कायद्याखाली व पब्लिक ट्रस्ट कायद्याखाली नोंदलेलीं मंडळें, सहकारी कायद्याखाली नोंदलेल्या संस्था, राज्य सरकार, यांचा समावेश त्यांत केलेला आहे. योग्य कारणाशिवाय कोणासहि सभासद करून घेणेचे नाकारतां येणार नाहीं. एकाद्या सहकारी संस्थेनें एकाद्यास सभासद करून घेणेचें नाकारल्यास त्यास फेडरल संस्थेचे अध्यक्षाकडे अपील करतां येईल. सहकारी संस्था फेडरल संस्थेस जोडलेली नसल्यास सभासद करून घेणेचें नाकारलेल्या व्यक्तीस अगर संस्थेस मुंबई राज्य सहकारी संघाचे अध्यक्षांकडे अपील करून दाद मागतां येईल. एकाद्या सभासदानें राजिनामा दिल्यावर अगर त्यानें आपले सर्व भाग दुसऱ्याच्या नांवानें वर्ग केल्यास अगर सभासद मृत्यु पावल्यास, अगर सभासदास संस्थेंतून काढून टाकल्यास त्या सभासदाचे सभासदत्वाचे सर्व हक्क संपुष्टांत येतील. एकाद्या सभासदाचें कर्ज शिल्लक असल्यास अगर दुसऱ्या कर्जास तो जामीन असल्यास अशा सभासदाचा राजीनामा मंजूर करतां येणार नाहीं. तसेंच राजीनामा देणेपूर्वी सभासदानें त्याचें मनोगत एक महिना अगोदर संस्थेस कळविलें पाहिजे.

### सभासदाचा मतदानाचा हक्क

प्रत्येक सभासदास एक मत असेल. एकादी सहकारी संस्था दुसऱ्या सहकारी संस्थेची सभासद असल्यास त्या संस्थेस आणखी एक मत असेल. ज्यावेळीं राज्यसरकार एकाद्या सहकारी संस्थेचे सभासद असेल, त्यावेळीं राज्यसरकारतर्फे पंचकमिटीवर जितके सभासद असतील त्या सर्वांना प्रत्येकीं एक मत असेल.

### सभासदाच्या भाग भांडवलावरील मर्यादा

मर्यादित जबाबदारीच्या सहकारी संस्थेच्या भाग-भांडवलांत सहकारी संस्था व राज्यसरकार वगळून, सभासदास, नियम-पोटनियमांत उल्लेख केलेल्या भाग-भांडवलापेक्षा जास्त भाग-भांडवल धारण करतां येणार नाहीं. कमाल भाग-भांडवल मर्यादा १/५ पेक्षा जास्त असणार नाहीं.

### भाग वर्ग करण्याच्या मर्यादा

सहकारी संस्थेच्या भाग-भांडवलांतील सभासदांचे हक्कहितसंबंध अगर भाग त्या संस्थेच्या पंचकमिटीनें अनुमति दिल्याशिवाय सभासदांस वर्ग करतां येणार नाहीं, अगर त्यावर बोजानिर्मिति करतां येणार नाहीं. तसेंच ज्याच्या नांवानें भाग वर्ग करावयाचे असतील त्यास नियम, पोटनियम व सहकारी कायद्यांत नमूद केलेल्या कमाल मर्यादेपेक्षा जास्त भाग धारण करतां येणार नाहींत. ज्या सभासदानें एक वर्ष मुदतीपेक्षा कमी काल भाग धारण केले असतील अशा सभासदास सदरच्या मुदतीपर्यंत भाग वर्ग करतां येणार नाहींत व सभासदत्वाचा अर्ज मंजूर केल्याशिवाय भाग वर्ग केले जाणार नाहींत. तसेंच सहकारी संस्थेच्या भाग-भांडवलांतील हक्कसंबंध अगर भाग जप्तीस पात्र असणार नाहींत.

नियोजित कलम ३२ अन्वयें सभासदांस सहकारी संस्थेच्या कार्यालयांत, कामाच्या नमूद केलेल्या वेळांत, पोटनियम, नियम, सहकारी कायदा, शेवटचा वार्षिक ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, सभासदांचें रजिस्टर, साधारण सभेची मिनिटस्, व ज्या पुस्तकांत सहकारी संस्थच्या व्यवहाराची माहिती नोंदवली असेल तें पुस्तक विनामूल्य पाहाणेची तरतूद केलेली आहे.

मुंबई सहकारी सोसायट्यांच्या कायद्याखालील कानू ४५ अन्वयें कर्ज घेणाऱ्या सभासदांचे बाबतींत कर्ज देणाऱ्या सहकारी संस्थेपैकी एकाच सहकारी संस्थेंतून त्यास कर्ज घेतां येईल अशी तरतूद आहे. ही तरतूद नियोजित कायद्यांत कलम ३३ मध्यें मांडलेली आहे. सभासदानें घेतलेल्या कर्जाचा विनियोग त्याच कारणासाठी केला पाहिजे. तसें न केल्यास व सोसायटीनें कर्ज मागणी केल्यास, कर्जरक्कम परत केली पाहिजे. ह्या अटींचें पालन न केल्यास कर्जदार सभासदास काढून टाकणेचा अधिकार ठेवलेला आहे.

### सभासदाची हकालपट्टी

एकाद्या सभासदानें त्याचे गैरवर्तनामुळें सोसायटीचें सांपत्तिक नुकसान केलें असल्यास साधारण सभेस ३/४ बहुमतानें अशा सभासदास काढून टाकणेचा ठराव करतां येईल. मात्र त्यापूर्वी

अशा सभासदास त्याची बाजू मांडणेची संधि दिली पाहिजे. साधारण सभेच्या ठरावास रजिस्ट्रार यांनीं मंजुरी दिली पाहिजे. अशा तऱ्हेनें काढून टाकलेल्या सभासदास, काढून टाकलेल्या संस्थेचे अगर दुसऱ्या कोणत्याहि सहकारी संस्थेचे २ वर्षेपर्यंत सभासद म्हणून होतां येणार नाहीं. कांहीं विशिष्ट परिस्थितींत रजिष्ट्रार यांना सदरच्या मुदतींच्या अगोदरहि त्या अगर दुसऱ्या सहकारी संस्थेचे सभासद म्हणून स्वीकृत करून घेणेचा अधिकार ठेवलेला आहे.

---

## बँकनोकरांचा महागाई भत्ता वाढणार

### ६०,००० नोकरांना जादा दरानें भत्ता

बँक अवार्डच्या तरतुदीप्रमाणें बँकांतील कारकून व कनिष्ठ नोकर ह्यांना देण्यांत येणारा महागाई भत्ता अनुक्रमें एक सप्तमांशानें व एक दशांशानें वाढविण्यांत यावा, अशी सूचना इंडियन बँक्स असोसिएशननें व कलकत्ता एक्सचेंज बँक्स असोसिएशननें आपल्या सभासद-बँकांना केली आहे.

अखिल भारतीय किंमतीचा इंडेक्स नंबर पहिल्या किंवा दुसऱ्या सहामाहींत मूळ १४४ च्या पेक्षा १० पॉइंट्सनीं वाढला किंवा उतरला, तर त्याच्या पुढील सहामाहींत बँक-नोकरांना मिळावयाचा महागाई भत्ता प्रत्येक १० पॉइंट्सना मूळ भत्त्याच्या अनुक्रमें एक सप्तमांश व एक दशांश ह्या प्रमाणांत वाढावा किंवा कमी व्हावी, अशी बँक-अवार्डची तरतूद आहे.

जुलै-डिसेंबर, १९५७ चा इंडेक्स नंबर इंडियन लेबर गॅझेट-मध्यें मार्च, १९५८ अखेर प्रसिद्ध होईल. परंतु जुलै, ऑगस्ट व सप्टेंबरचे जे आंकडे उपलब्ध आहेत, त्यांवरून जुलै-डिसेंबर ह्या सहामाहींतील इंडेक्स नंबरची सरासरी १० पॉइंटसनीं वाढलेली असेल, अशी खात्री वाटते. म्हणून, आतांच महागाई भत्ता वाढविण्यास हरकत नाहीं.

---

## पृथ्वीचें स्वतःभोंवतीं फिरणें अपेक्षेपेक्षा लवकर थांबेल

पृथ्वीचा स्वतःभोंवतीं फिरण्याचा वेग मूळ कल्पनेपेक्षा ५० पटींनीं कमी होत आहे, असें टेडिंगटनच्या नॅशनल फिजिक्स लॅबोरेटरीच्या डॉ. लुइ एसेननें जाहीर केलें आहे. त्यामुळें, पृथ्वी अपेक्षेपेक्षा लवकर स्थिर स्थितीस येईल. त्यावेळीं जेथें दिवस असेल, तेथें कायम दिवस राहील; उलट बाजू कायम अंधारांत राहील. भरती-ओहोटी थांबेल. चंद्रावरील परिस्थितीप्रमाणें पृथ्वीवर परिस्थिति होईल. ॲटॉमिक घड्याळामुळें दिवस-रात्र बिनचूक मोजणें आतां शक्य आहे. ह्या घड्याळाप्रमाणें, दोन वर्षांपूर्वीच्या मानानें आतांचा दिवस एका सेकंदाच्या एकहजारांश, एवढ्यानें मोठा आहे. ग्रीनिच वेधशाळेच्या तज्ज्ञांचे मतें पृथ्वीच्या भ्रमंतीमध्यें थोडाफार फरक नेहेमींच घडून येत असतो; ते डॉ. एसेनच्या म्हणण्याला विशेष महत्त्व देण्यास तयार नाहींत.

---

## रत्नागिरी येथें लोकमान्यांचें स्मारक

रत्नागिरी येथील लोकमान्य टिळकांचें जन्मस्थान मध्यवर्ती सरकार मिळवून घेऊन तेथें एक स्मारक उभारील, असें भारत सरकारनें लोकमान्य टिळक शतसांवत्सरिक उत्सवाचे वेळीं, जुलै १९५६ मध्यें, जाहीर केलें होतें. त्याप्रमाणें, लोकमान्यांचा ज्या घरीं जन्म झाला, तें घर व त्याचें आवार मालकिणीकडून आतां ३०,००० रुपयांस विकत घेण्यांत आलें आहे. स्मारकाचें स्वरूप अद्याप ठरलेलें नाहीं.

## "कार्यबहुत्वे बहुफलमायतिकं कुर्यात्।"

### सारस्वत को. बँकेचें वाचनालय व ग्रंथालय

सारस्वत को. बँक लि., मुंबई, ह्या आदर्श सहकारी अर्बन बँकेनें आपल्या उपक्रमांत आणखी एकाची भर घातली आहे. व्यापार, सहकार, अर्थशास्त्र, बँकिंग, विमा, कायदा आणि संबंधीं विषय, ह्यांच्या पुस्तकांची किंमत अतिशय भारी असते. त्यामुळें, मध्यमवर्गीयांना त्यावर खर्च करणें अशक्य होतें. ह्या विषयांच्या विद्यार्थ्यांची व अभ्यासकांची सोय करण्याच्या हेतूनें, अशा उपयुक्त पुस्तकांचें वाचनालय व ग्रंथालय सारस्वत बँकेनें सुरू केलें आहे. बँकेचा नोकरवर्ग, सभासद वर्ग, इतकेंच नव्हे तर ठेवीदारहि ह्या सोईचा फायदा घेऊं शकतील, हें त्याचें वैशिष्ट्य आहे. म्हणजे, कुणालाहि त्याचा फायदा घेतां येईल, असें म्हणण्यास हरकत नाहीं. बँकेनें उघडलेल्या वाचनालयांत व ग्रंथालयांत आर्थिक विषयांचींच पुस्तकें असणार आहेत. म्हणजे, वाचकांना त्यांच्या वाचनानें अर्थप्राप्ति होण्यास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत होणार आहे. सारस्वत बँकेची ही जनसेवा ह्या दृष्टीनें विशेष महत्त्वाची आहे. वाचनालय व ग्रंथालय उघडें असण्याची वेळ संध्याकाळीं ४-३० ते ६-३० (शनिवारीं २-३० ते ४-३०) अशी आहे.

"ज्यापासून पुष्कळ व दीर्घकालिक फलनिष्पत्ति होणार असेल, तें कार्य आधीं करावें" असें एक सुप्रसिद्ध चाणक्यसूत्र आहे. कौटिल्याच्या अर्थशास्त्रांतील ह्या सिद्धांताला धरूनच सारस्वत बँकेचा हा उपक्रम आहे. त्याचा ज्यास्तींत ज्यास्त विद्यार्थी व अभ्यासू उपयोग करून घेतील, अशी आशा आहे.

---

## कॅलेंडरें वर्षाच्या आरंभीं द्या!

व्यापारी फर्म्स व कंपन्या दरसाल डायऱ्या, कॅलेंडरें इत्यादि आपल्या ग्राहकांना व हितचिंतकांना वाटतात. १ जानेवारी रोजीं नवें वर्ष सुरू होतें आणि जुन्या वर्षाच्या डायऱ्या व कॅलेंडरें निरुपयोगी होतात. पण, नव्या डायऱ्या व कॅलेंडरें जानेवारी संपत आला, तरी तयार होऊन पोचती केली जात नाहींत, असें कित्येक वेळां आढळून येतें. अर्थात्, ह्या गोष्टी विनामूल्य, भेट म्हणून, देण्यांत येत असल्यानें त्याबद्दल तक्रार करण्याचा हक्क ग्राहकाला नसतो. पण, वेळेवर त्या दिल्या गेल्या तर कितीतरी सोय होईल! त्याला ज्यास्त खर्च लागणार नसून, फक्त पूर्वतयारीची व कार्यक्षमतेची आवश्यकता असते. ब्रिटिश व अमेरिकन फर्म्स आणि कंपन्या ह्यांची दक्षता ह्या बाबतींत अनुकरणीय आहे. भेटीची गोडी व औचित्य ती भेट वेळेवर देण्यावर अवलंबून असल्यानें, त्याविषयीं जागरूक न रहाणें म्हणजे भेट देण्यांत आत्मीयता नाहीं, असें कबूल करण्यासारखेंच आहे! ज्या फर्म्स व कंपन्या आपल्या भेटी वेळेवर पाठवितात, त्यांचें आम्हीं मनःपूर्वक अभिनंदन करतों.

---

## मेयरची लहान मोटर

मुंबईच्या मेयरची सध्यांची मोठी मोटर बदलून तिचे जागीं लहान मोटर घेण्यांत यावी, असें मुंबईच्या म्यु. कॉर्पोरेशनच्या स्टँडिंग कमिटीनें ठरविलें आहे. खुद्द मेयरच्या विनंतीवरूनच हा निर्णय घेण्यांत आला. मेयरची सध्यांची १८,४०० रुपयांची मोटर विकली, तर तिचे १४,००० रुपये येतील. नवी लहान मोटर १३,३२४ रुपयांस मिळेल व तिच्यामुळें वार्षिक खर्चांत १,००० रु. ची बचत होईल.

### सेंट्रल बँकेचा १·०८ कोटी रु. नफा

सेंट्रल बँक ऑफ इंडियाला १९५७ मध्यें १ कोटी, ८ लक्ष रु. नफा झाला. त्यांत १८·२३ लक्ष रुपये शिल्की नफा मिळविला, म्हणजे नफा वाटणीस १·२६ कोटी रुपये येतात. १४% डिव्हिडंड कायम राहील.

### पिसाचा कलता मनोरा

पिसा (इटली) चा 'लीनिंग' टॉवर अधिकाधिक कलत चालला असून, त्याची ही प्रवृत्ति थांबवितां आली नाहीं, तर येत्या २०० वर्षांत तो कोसळून पडेल, असें तज्ज्ञांचें मत आहे. १९३४ सालीं त्या टॉवरच्या बुडांत ९० टन कॉंक्रीट ओतण्यांत आलें, पण तेवढ्यानें भागलें नाहीं. टॉवर ज्यावर बांधण्यांत आला आहे, त्या जमिनीचा खालचा थरच टॉवरला सरळ उभें ठेवण्यास अनुकूल नाहीं!

### तेलगू-इंग्रजीप्रमाणें उर्दूंतहि पाट्या

हैद्राबाद आणि सिकंदराबाद येथील सरकारी कचेऱ्यांवरील पाट्या सध्यां तेलुगू आणि इंग्रजी भाषांत आहेत; आतां उर्दूमध्येंहि पाट्या लावल्या जातील, असें आंध्र प्रदेश सरकारनें जाहीर केलें आहे.

**केरळ राज्याची औद्योगिक पहाणी**—केरळ राज्याचा औद्योगीकरण करण्याच्या दृष्टीनें पहाणी करण्यासाठी अखिल भारतीय कारखानदार संघानें आपलें प्रतिनिधिमंडळ राज्यांत पाठवावें अशी विनंती राज्य सरकारतर्फे करण्यांत आली आहे. कारखानदार संघानें विनंती मान्य करून मार्च महिन्यांत आपलें मंडळ पाठविण्याचें कबूल केलें आहे.

**एंजिनिअर्सना परदेशी शिक्षण**—ब्रिटनमधील पोलादाच्या कारखान्यांतून शिक्षण घेण्यासाठी भारतामधील आणखी २३ तरुण एंजिनिअर्स रवाना झाले. ते कोलंबो मदत योजनेप्रमाणें एक वर्षभर कारखान्यांत काम करून शिकतील व अनुभव घेतील. भारतांत परत आल्यावर ते नव्या पोलाद कारखान्यांतून रुजूं होतील.

**शंकराचार्यांचा अमेरिकेचा दौरा**— जगद्‌गुरु शंकराचार्य येत्या फेब्रुआरी आणि मार्च महिन्यांत अमेरिकेचा दौरा करणार आहेत. ह्या धार्मिक पीठाच्या अधिकाऱ्यानें परदेशगमन करण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे. आपल्या दौऱ्यांत ते अनेक ठिकाणीं धर्मावर व संस्कृतीवर व्याख्यानें देणार आहेत. ते टेलिव्हिजनवर मुलाखतहि देणार आहेत.

**लोकनृत्याचा महोत्सव**—प्रजासत्ताक दिनानिमित्त तारीख २७ व २८ जानेवारी रोजीं दिल्ली येथें लोकनृत्याचा महोत्सव साजरा करण्यांत येणार आहे. त्या निमित्तानें भारताच्या निरनिराळ्या भागांतून सुमारें ९०० नृत्यकलाविशारद राजधानींत येणार आहेत. ह्या कलावंतांची उतरण्याची सोय करण्यासाठीं एक स्वतंत्र वसाहतच उभारण्यांत आली आहे.

**तेनसिंग ह्यांची इटलीची सफर**—हिमालयाच्या अत्युच्च शिखरावर आरोहण करणारे तेनसिंग नॉर्के हे इटलींतील हिवाळी खेळांत भाग घेण्यासाठी तिकडे गेले आहेत. उत्तर इटलींतील ट्रेंटो शहराच्या मेयरनें त्यांना आमंत्रण दिलें होतें. आपल्या तेथील मुक्कामांत आल्प्स पर्वतावरील एका शिखरावर चढण्याचाहि ते प्रयत्न करतील.


## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.**

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८१,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. व. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. ग. घंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.

## दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर, ओझर (तांबट) जि. नाशिक, खोपोली जि. कुलाबा

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) — श्री. का. म. महाजन (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,१४,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ६५,००,०००चे वर |

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
मॅनेजिंग डायरेक्टर्स


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.